# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/02/2024 (शनिवार) दुपार

## चोरी

पो.स्टे. कोंढाळी :- अंतर्गत मौजा दोडकी येथे दिनांक ०१/०२/२०२४ चे १८.०० वा. ते १९.०० वा. दरम्यान फिर्यादी अशोक गुलाबराव तांदळे, वय ४२ वर्ष, रा. दोडकी याचे शेतातील स्वराज ट्रॅक्टर मधील एक्साइड कंपनीची बॅटरी किंमती ७०००/- रू. ची कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस हवालदार सुनिल ठोंबरे यांनी भेट दिली असुन आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सरोदे हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. काटोल :- अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील वंडली वाघ शेत शिवार येथे दिनांक २८/०१/२०२४ चे १८.०० वा. ते दि. २९/०१/२०२४ चे ०८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे- घनशाम विठोबाजी हजारे, वय ५३ वर्ष, रा. पेठबुधवार काटोल तह. काटोल याने त्याचे मौजा वंडली वाघ शेत शिवारातील सिमेंटच्या गोठयात ठेवलेला ०२ क्विंटल कापुस किंमती १०,०००/- रू. चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस उपनिरीक्षक गोगले पोस्टे काटोल यांनी भेट दिली असुन आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक निलेश तायडे पोस्टे काटोल हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर